Con 566

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा

## प्रश्नपत्रिका एक — विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण

रविवार, दिनांक ८ जानेवारी २०२३

[**वेळ :** सकाळी १०-३० ते दुपारी १-१५]

(तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून)

(**एकूण गुण** — १००)

---

**सूचना.**— (१) **नवीन प्रश्न** नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा **पूर्ण गुण** दिले जाणार नाहीत.

**गुण**

१. पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा :— १०

हेडमास्तर श्री. नाईक मास्तर यांचा शाळेत दरारा असे. तसे ते शिस्तीचे कडे भोक्ते. या शिस्तप्रिय हेडमास्तरांनी माझ्या शाळेला चांगलीच शिस्त लावली. शाळेची दुसरी घंटा होताच ते हातात छडी घेऊन शाळेच्या दारात थांबत. अशा शिस्तीत मग कोण उशीरा येईल ! असा त्यांचा दरारा.

श्री. नाईक हे मला इंग्रजी चौथीत इंग्रजी आणि इतिहास शिकवत. त्यात इंग्रजीचे 'रेन - मार्टिन' चे ग्रामर ते आवडीने शिकवत. ते सदानकदा विद्यार्थ्यांना समुपदेश करत. श्री. रायगावकर मास्तरांसारखे ते कधीही इतर सार्वजनिक कार्यात पडत नसत. आपण बरं अन् आपली शाळा बरी, हेच त्यांचं कार्य. त्यामुळे त्यांनी शाळेला शिस्त आणली आणि परीक्षेच्या निकालाच्या दृष्टीने त्यांनी शाळेची चांगली प्रगती केली.

औंधला शिकायला जाणार म्हणून मी श्री. नाईक मास्तरांना भेटलो. त्यांनी मला योग्य असं मार्गदर्शन केलं. शाळेत असतानाही त्यांचं माझ्यावर लक्ष होतं. शिस्तीच्या दृष्टीने कसं वागावे, जीवनात आपली प्रगती कशी करून घ्यावी, याबाबतीत त्यांनी केलेला हितोपदेश मी कधीच विसरू शकत नाही.

श्री. रायगावकर, देशपांडे या शिक्षकांनी तर मला संस्कारदृष्ट्या फारच उपकृत करून ठेवले आहे. कसे ते एक—दोन प्रसंग येथे उद्धृत करून स्पष्ट करतो.

कुस्तीसारख्या खेळात सुद्धा जात पात मानली जात असे. आमच्या गावातही आम्हां मुलांसाठी वेगळी तालीम होती. लहानपणी मी बऱ्यापैकी कुस्त्या करत असे. हंगामात कुस्त्या करून मी कधी खोबरे, तर कधी नारळ, तर कधी एखाद्या रुपयापर्यंत इनामे मिळवली आहेत. एक मिळाल्याचे आठवते.

असाच बाहेरगावी मी कुस्त्यांचा फड पहायला गेलो होतो. तेथे एका थोराड मुलाला, 'याला जोड, याला जोड' म्हणून फडात फिरवत होतो. दोन राऊंड मारूनही त्याला कुणी जोड उभा राहिला नाही. तेव्हा आमच्यातला एक म्हणाला, 'शंकऱ्या उठतोस का ? धरतोस का कुस्ती त्या गड्याबरोबर ?'

मी 'हा हा' म्हणत मैदानात गेलो आणि लढत करण्याची तयारी दर्शवली; पण मला कुणीतरी ओळखले आणि हटकले.

[उलटून पहा

गुण

मी हिरमुसला होऊन माघारी गेलो. हा प्रसंग माझ्या मनाला लागला हे ओळखून रायगावकरांनी माझी समजूत घातली. म्हणाले, 'अरे, समाज अजून निद्रिस्त आहे. खेळात-मैदानात जात न पाहता कौशल्य पाहावे, हे अजून त्याला नीट समजले नाही. पण एक दिवस असा येईल की, हे सारे नष्ट होईल. तुम्हांलाही खेळात-स्पर्धेत मानाने बोलवले जाईल.'

असाच एक दुसरा प्रसंग...

शिमग्याच्या धुळवडीला आमच्या वस्तीतील प्रौढ वर्गात तमाशाचा फड उभा राहिला. त्या दिवशी प्रौढ साक्षरतेचा वर्ग बंद होता; पण रायगावकर मास्तरांना याची कल्पना नसल्याने ते नेहमीप्रमाणे वर्गाला भेट द्यायला आले. प्रौढ वर्गाच्या कंदिलाच्या प्रकाशात तमाशा चालला होता, ते पाहून रायगावकर चटकन परत फिरले. त्यांना पाहताच मी त्यांना आडवा गेलो. माझी मान खाली झाली होती, ते पाहून मास्तर म्हणाले. "अरे ! आज धूलिवंदन ! हे चालायचेच !" अन् मास्तर तसेच वाटेला गेले.

मग मास्तर मला दुसऱ्या दिवशी बोलले, "शंकर ! तू हे ध्यानात ठेव. जिथे प्रौढ साक्षरतेचा वर्ग चालतो, तुम्ही अभ्यास करता त्या विद्येच्या मंदिरात तमाशा कसा उभा ... ?"

सरांनी मला केलेला हा उपदेश मी कधीच विसरू शकत नव्हतो.

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :—

(अ) लेखकाला नाईक मास्तरांनी कशाप्रकारे मार्गदर्शन केले ?

(ब) हेडमास्तरांनी लेखकाच्या शाळेला कशाप्रकारे शिस्त लावली ?

(क) रायगावकर मास्तरांना पाहून लेखकाची मान खाली का झाली ?

(ड) रायगावकर मास्तरांनी लेखकाची समजूत कशाप्रकारे काढली ?

(इ) रायगावकर मास्तरांनी शंकरला कोणता उपदेश केला ?

२. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५ ते ६ ओळींत लिहा :— २०

(अ) बिनसाखरेचा चहा कडू लागतो हे पंतांच्या केव्हा लक्षात आले हे उपास या पाठाच्या आधारे लिहा.

(ब) 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते ते मोठे होत असलेल्या मुलांनो या स्थूलवाचनाच्या आधारे लिहा.

(क) 'झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले' वरील ओळीतून कवी नारायण सुर्वे यांना काय सांगायचे आहे ते स्पष्ट करा.

(ड) दाजी साहेबांनी अब्दुलचा सत्कार का केला, सकारण लिहा.

(इ) पावडेकाका पर्यावरणास मारक अशी कोणती कृती करत होते ते फूटप्रिन्ट्स या पाठाच्या आधारे लिहा.

(फ) लेखक डॉ. रघुनाथ माशेलकर यांना युनियन हायस्कूलमध्ये कशाप्रकारे प्रवेश मिळाला ?

३. (अ) खालीलपैकी कोणत्याही **दहा** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :— १०

(१) चातक पक्षी कोणाची विनवणी करतो ?

(२) वाईला लेखक रा. ग. जाधव कोण म्हणून गेले होते ?

(३) पंतांना ताटामध्ये काय दिसू लागले ?

(४) लहान मुलींनी एकदम गलका करायला सुरुवात का केली ?

गुण

(५) रेखामावशी कोठे राहत होती ?

(६) उदरनिर्वाहासाठी लेखक डॉ. माशेलकर आणि त्यांच्या आईला कुठे जावे लागले ?

(७) जवानाचे रक्षण कसे होणार आहे ?

(८) कादंबरी वाचताना वाचक कशात रममाण होतो ?

(९) दुर्बिणीने काय स्पष्ट दिसले ?

(१०) कवयित्री अंजली कुलकर्णी कोणाला पुष्टी द्यायला सांगतात ?

(११) झाडाच्या मुळावर घाव घातल्यावर त्याची प्रतिक्रिया काय असते ?

(१२) निरंजनने कोणते आर्जवं केले ?

(ब) खालील काव्यपंक्तींचे रसग्रहण करा (कोणतेही **दोन**) :— ५

(१) तैसे योगियासी खालुतें येणें। जे इहलोकी जन्म पावणें।
जन निववी श्रवणकीर्तनें। निजज्ञानें उद्धरी।

(२) दुनियेचा विचार हरघडी केला; असा जगमय झालो
दुःख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो.

(३) फुलाफुलांचे दाट ताटवे, जिथे पोचते दृष्टी
रंग मजेचे, रंग उद्याचे, जपून ठेवू सृष्टी ......

४. खालीलपैकी कोणत्याही **दहा** रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :— १०

(अ) .................... सुखी करी एक वेळ । योगी सर्वकाळ सुखदाता ।।

(ब) "त्या बाळाला आधी .................... गुंडाळ आणि मग मासे मारत बैस."

(क) आमच्या कोकणात सगळे .................... खातात.

(ड) .................... करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे.

(इ) .................... त्यांच्याबरोबर बसायला संकोच वाटला.

(फ) .................... खणखणीत आवाजानं सुमितही जागा झाला आणि हॉलमध्ये आला.

(ग) .................... हीच प्रत्येक मुलाची पहिली शिक्षक असते.

(ह) नाही कष्टाचे ....................

(य) साहित्य क्षेत्रातला सर्वोच्च मानाचा .................... पुरस्कार वि. स. खांडेकर यांच्या ययाति या कादंबरीला मिळाला.

(र) धन्य आमुची .................... मराठी, धन्य साहित्यसंपदा.

(ल) वाघिणीनं .................... पार करून बांबूच्या गंजीत पाय ठेवला.

५. (अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :— १०

(१) आकाश ठेंगणे होणे (२) उचल घेणे

(३) कच खाणे (४) कानाडोळा करणे

(५) गळ्यात गळा घालणे (६) घोडे मारणे.

(ब) खालीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांचे अर्थ लिहा :— ५

(१) तपास (२) जाड

(३) धन (४) खरा

(५) थाट (६) टाकाऊ.

[ उलटून पहा

गुण

६. (अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** रिकाम्या जागी योग्य ते नाम लिहा :— ५

(१) मी ………………… पेठेतील ओंकारेश्वर मंदिराच्या पुलावर बहुधा रोज संध्याकाळी जात असे.

(२) एके दिवशी नुसती ………………… उकडून तिने मला खायला घातली.

(३) ………………… सांगितलेला हा मुद्दा माझ्या मनावर कोरला गेला.

(४) आंब्याच्या झाडाखाली असलेल्या चौथऱ्यावर ………………… बसला.

(५) ………………… हे एक शास्त्रीय सत्य आहे.

(६) ………………… तुमची ऊर्जाशक्ती एकत्र करा, काहीही जाळता येईल.

(ब) खालीलपैकी कोणत्याही **पाच** अधोरेखित शब्दांचे लिंग ओळखा :— ५

(१) पुलाच्या जवळपास मध्यावर तो भिक्षेकरी म्हातारा दिसला.

(२) अब्दुलने पायांत चपला सरकावल्या.

(३) आपल्याला येत नसताना दुसऱ्यांना काम सांगणं योग्य नाही.

(४) कधीही लाभणार नाही असे सत्काराचे भाग्य त्याच्या वाट्याला आले होते.

(५) कल्पनांचा सुंदर आविष्कार कवितेत असतो, हे बरोबर ना ?

(६) वाघांच्या लहान पिल्लांना इतर भक्षकांपासून खूपच धोका असतो.

(क) खालीलपैकी कोणत्याही **पाच** नामांची वचने बदला :— ५

(१) कादंबरी (२) बदक

(३) सासू (४) वाडा

(५) घडा (६) चाक.

(ड) खालीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांपासून नामे बनवा :— ५

(१) सौंदर्य (२) धैर्य

(३) वात्सल्य (४) माधुर्य

(५) नावीन्य (६) गांभीर्य.

(इ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांच्या संधी सोडवा :— ५

(१) उपाहार (२) सर्वोच्च

(३) प्रारंभ (४) पंचेंद्रिय

(५) परीक्षक (६) प्रश्नोत्तर.

गुण

(फ) कंसात दिलेल्या सूचनांप्रमाणे बदल करून कोणतीही **पाच** वाक्ये पुन्हा लिहा :— ५

(१) तत्कालीन एक-दोन वर्षात माझ्यावर शालिंचा वरशाव झाला.
(वाक्य शुद्ध करून लिहा)

(२) ' इश्श ! साखरेशिवाय लाडू आमच्या नाही घराण्यात केले कुणी!'
(अधोरेखित शब्दाची जात ओळखून लिहा)

(३) मामा मी एक ॲप तयार केलं आहे.
(वाक्याचा प्रकार ओळखा)

(४) माझे मामाही याच गावातले.
(कर्त्याचे लिंग बदल करा)

(५) आज बाबा आणि काका कार्यक्रमाला जाणार होते.
(अधोरेखित शब्दाचा अव्यय ओळखा)

(६) स्नेहलने पावडेकाकांना पाणी दिलं.
(काळ ओळखा)

---

CON 569

# एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

## राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा

## प्रश्नपत्रिका दोन — सुसंगत लेखन व अनुवाद

रविवार, दिनांक ८ जानेवारी २०२३

[**वेळ** : दुपारी २-१५ ते सायंकाळी ४-४५]

(**एकूण गुण** — १००)

---

**सूचना**.— (१) **नवीन प्रश्न** नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा **पूर्ण गुण** दिले जाणार नाहीत.

गुण

१. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे १५ ते २० ओळींत तुमचे विचार मांडा :— २०

(अ) वन्यप्राण्यांचे संरक्षण

(ब) देशाच्या प्रगतीमधील महिलांचे योगदान.

२. पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर चर्चा करा :— २०

(अ) 'विद्यार्थी आणि स्वावलंबन' या विषयी चर्चा करा.

(ब) 'जीवनात खेळाचे महत्त्व' या विषयी चर्चा करा.

३. पुढीलपैकी कोणत्याही **दोन** बाबी तयार करा :— ३०

(अ) स्वेच्छा निवृत्तीसाठी अर्ज करून त्यावर टिप्पणी व ज्ञापन करा.

(ब) पावसाळ्याआधी आपल्या परिसरातील नाल्यांची सफाई करून घेण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यास विनंतीपत्र लिहा.

(क) गावामध्ये सातत्याने खंडित होणारा वीजपुरवठा नियमित करण्यासाठी विनंतीपत्र लिहा.

(ड) महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी उपाय योजनांचे मार्गदर्शन करणारे परिपत्रक तयार करा.

४. पुढील कोणत्याही **पाच** इंग्रजी शब्दप्रयोगांसाठी संज्ञांचे मराठी पर्याय द्या :— ५

(अ) Announce (ब) Developer

(क) Co-operative society (ड) Foreign currency

(इ) Inspiration (फ) Magistrate.

५. खालीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्यांचे मराठीत भाषांतर करा :— १०

(अ) The most important thing in the Olympic Games is not winning but taking part.

(ब) I spend as much time working in the garden in one day as my brother does in a week.

(क) Since my mother was sick, I couldn't leave the house last Saturday.

(ड) The teacher taught them that the earth is round.

(इ) New factories and industrial centers were built.

(फ) Photography is now considered a new from of art.

[उलटून पहा

गुण

६. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा :— १५

Banaras is the oldest and most famous city on the banks of the Ganges. It is a city of temples. Why do people visit Banaras ? They go to Banaras, because they believe that if they bathe in the holy waters of Ganges, all their sins will be washed away. Many old men and women come here to die, because they think it good to die on the banks of the Ganges. It is the last wish of every pious Hindu that when he dies, his ashes should be taken to Haridwar or Banaras and cast into the sacred water of Ganges.